# कुळगांव-बदलापूर नगरपरिषद

## गणेश मुर्ती विसर्जन कृत्रिम तलाव

## २००९



# कुळगांव बदलापूर नगरपरिषद
# गणेश मुर्ती विसर्जन कृत्रिम तलाव

कुळगाव बदलापूर नगरपरिषद क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात सार्वजनिक व घरगुती गणपतीची प्रतिष्ठापणा केली जाते. सदरच्या मुर्तीपैकी बव्हतांशी मुर्ती हया प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या बनविल्या जातात. सदर गणपतींचे विसर्जन नदी, नाले, तलाव, विहीरच्या मध्ये केले जाते.गणपतीच्या मुर्ती या प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या बनविल्या असल्यामुळे विसर्जनानंतर त्या पाण्यामध्ये विरघळत नाहीत. तसेच मुर्तीच्या रंगातील रासायनिक द्रव्यामुळे पाण्यातील मासे, जीवजंतू यांची मोठया प्रमाणात हानी होते. तसेच पिण्याचे पाण्याचे साठे यामुळे प्रदुषित होतात. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे.

नदीमध्ये किंवा इतर पाणीसाठा असलेल्या ठिकाणी गणेश विसर्जनासंदर्भात मा. उच्च न्यायालयात पी.आय.एल. नं. १०३५/२००३ अन्वये जनहित मंच यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरोधात जनहित याचिका दाखल केलेली होती. त्यानूसार दि. २२/७/२००७ रोजीच्या मा. उच्च न्यायालयातील सदर याचिकेच्या अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाने पर्यावरणाच्या दृष्टीने गणपतीचे विसर्जन इको फ्रेंडली पध्दतीने करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे तयार करण्याबाबतचे आदेश पारित केलेले होते. मा. उच्चन्यायालयातील आदेशानुसार गणपतींचे विसर्जन करण्यासंदर्भातील इकोफ्रेंडली पध्दतीने गणेशोत्सव साजरा करण्यासंदर्भातील सुचित केलेल्या संहितेतील मार्गदर्शन व शिफारसी नुसार कुळगांव बदलापूर नगरपरिषदेने गणपतींचे विसर्जन करण्यासंदर्भात कृत्रीम तलाव तयार करणेसंबंधि उप प्रादेशिक अधिकारी कल्याण - २ यांनी त्यांचेकडील पत्र क्र. एम.डी.सी.डी/एस.आर.ओ.के-II /२८५/दि. २१/७/२००९ अन्वये नगरपरिषदेला कळविलेले होते.

त्याप्रमाणे पर्यावरणदृष्टया गणपतींचे विसर्जन इको फ्रेंडली पध्दतीने करणेकरीता व उल्हासनदीचे प्रदुषण टाळण्याच्या दृष्टीने नगरपरिषदेने उल्हासनदीवरील गणेश घाटाजवळ कृत्रीम तलाव बांधण्याबाबतचा रु. १०.२६ लक्ष इतक्या रकमेचा प्रस्ताव तयार करण्यात आला. यासंदर्भात मुंबई महानगर क्षेत्रातील पर्यावरण सुधारणा संघ यांचेकडून अशा प्रकारे तयार करण्यात आलेल्या एका कृत्रिम तलावाकरिता अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याबाबत मा. संचालक पर्यावरण सुधारणा संघ आणि मुख्य, नियोजन विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडील पत्र क्र. एम.एम.आर.- इ.एन.व्ही./एस.ओ.सी./प्रोजेक्ट /९१ /२००९ / दि. १५/७/२००९ अन्वये नगरपरिषदेला कळवीले होते. त्यानुसार याबाबत मा. नगराध्यक्ष श्री. नंदकिशोर (राम)पातकर यांनी मा. संचालक , पर्यावरण सुधारणा संघ ,एम.एम.आर.डी.ए. यांचेशी चर्चा करुन अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतचा पाठपुरावा करण्यात आला व याकामी नगरपरिषदेला रु. ३.०० लक्ष इतके अनुदान मंजूर करण्यात आले.

त्यानुसार नगरपरिषदेने कुळगांव बदलापूर नगरपरिषद कार्यक्षेत्रात उल्हासनदीवरील गणेश घाट येथे कृत्रिम तलाव तयार केला. सदर कृत्रिम तलावामध्ये ७ दिवसांच्या गणेश विसर्जनाच्यावेळी सार्वजनिक तसेच घरगुती गणपतींसह एकुण १०४ गणपतींचे विसर्जन करण्यात आले. नगरपरिषदेने अशा प्रकारे पर्यावरणाचे सवंर्धन व संरक्षण करण्याच्या दृष्टीने हा एक आगळा वेगळा उपक्रम राबविलेला आहे. याबाबत नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले असून अनेक गणेशोत्सव मंडळांनी यापुढे कृत्रिम तलावात गणेश मुतींचे विसर्जन करण्याचे ठरविले आहे.

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेने यापूर्वीदेखील असेच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवीले असून पर्यावरणाचा ऱ्हास रोखणेबाबत जनजागृती केली आहे. रेनवॉटर हार्वेस्टीग व इकोलॉजिकल सॅनिटेशन या प्रकल्पांची तर केंद्र शासनाने दखल घेऊन मा. राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचे हस्ते राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविले आहे.




13 Aug New Delhi **National Urban Water Award 2009**
**Ram Patkar President Kulgoan Badlapur Muncipal Council**
**Receiving Award From President Of India Smt. Pratibhatai Patil**

# कुळगांव बदलापूर नगरपरिषद

## ❋ आवाहन ❋

कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील सर्व गणेशभक्तांना आवाहन करण्यात येते की, नगरपरिषदेने उल्हासनदीवरील गणेश घाट येथे गणेश विसर्जन करण्याकरिता कृत्रिम तलाव तयार केलेला आहे. उल्हासनदीच्या पाण्याचे प्रदुषण टाळण्यासाठी गणेश भक्तांनी सदर कृत्रिम तलावाचा गणेश विसर्जन करण्यासाठी वापर करावा ही विनंती.

| | | |
|---|---|---|
| (एस.एस.धुपे) | (सदानंद मेहेर) | (नंदकिशोर(राम) पातकर) |
| मुख्याधिकारी | उपनगराध्यक्ष | नगराध्यक्ष, |

कुळगांव बदलापूर नगरपरिषद

**Appeal to Ganesh Devotee for Immersion Ganesh Idol in Artificial Pond**

MMR
ENVIRONMENT
IMPROVEMENT
SOCIETY

Most Imp.

No: MMR-ENV/SOC/Project/91/2009 15th July, 2009

To,

**The Chief Officer,**
Kulgaon-Badlapur Municipal Council,
Adarsh Vidya Mandir Road,
Dist. Thane,
**Kulgaon (East) - 421 503.**

Tel. 95251-2690397
Fax. 95251-2690270

**Sub: Artificial Ponds for idol immersion during Ganesh Festival**

Sir,

The Mumbai Metropolitan Region – Environment Improvement Society (MMR-EIS) is setup by the Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) to take up activities to promote, protection, preservation and improvement of the environment through research and demonstration.

The pollution of water bodies due to Ganesh idol immersions has been one of the important environmental concerns. A number of Municipalities have developed an innovative system of an 'artificial pond' (which is lined with polythene) to deal with the problem.

The society encourages all Municipalities /Municipal Councils in MMR to develop such ponds for which the society would provide financial assistance towards the development of one pond. Also, Maharashtra Pollution Control Board (MPCB) has promised to provide technical assistance, if required.

(P.T.O.)

**MUMBAI METROPOLITAN REGION - ENVIRONMENT IMPROVEMENT SOCIETY**
MMRDA BUILDING, BANDRA - KURLA COMPLEX, BANDRA (EAST), MUMBAI - 400 051. TEL : 2659 1267 • FAX : 91-022-2659 4177
E-MAIL : mmrda@giasbm01.vsnl.net.in

**Letter from MMR Environment Improvement society to provide financial assistance for artificial pond,**

Page 1

# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD
## SUB-REGIONAL OFFICE-KALYAN-II

Tel. No. (0251) 2310167/2310212
Fax No. (0251) 2310192
Visit us on: http://mpcb.gov.in
E.mail: 1) rompcbkalyan@rediffmail.com

Sidhivinayak Sankul,
3rd Floor, Near Oak Baug,
Station Road,
Kalyan (West),
Dist. Thane – 421 301.

***Important***

Ref. MPCB/SROK-II/ 285

Date: 24/7/2007

To,
The Chief Officer,
Kulgaon-Badlapur Municipal Council,
Badlapur, Dist. Thane

Sub :- PIL No. 1035 of 2003 Janhit Manch and Ors V/s. State Maharashtra and others

Ref.:- Letter from HQ vide no. DO/P&L Division/B-4125 dtd. 24/06/2009

Sir,

The Hon'ble High Court has passed order dated 22/07/2007 directed the Central as well as State Govt. to evolve a strategy guideline for Environment Friendly Ganpati Idols immersion during the festival season.

You are requested to incorporate the condition of code of conduct for Eco Friendly immersion of Ganpati idols while granting NOC to registered Mandals and take awareness campaign during Ganesh Festival season.

The guidelines for immersion of Ganpati idols in Ganesh festival hosted on web site of MPC Board (http://mpcb.gov.in).

Sub-Regional Officer
Kalyan – II

Copy submitted to :-
1) Sr. Police Inspector, Badlapur Police Station, Badlapur, Dist. Thane.
2) Regional Officer, MPC Board,Kalyan.

**Letter from Maharashtra Pollution Control Board regarding PIL No.1035 of 2003 Janhit manch and Ors V/s State Maharashtra and**

iii) It would be appropriate to use traditional clay for idol making rather than baked clay. Use of painted idols should be discouraged. In case painted idols are used, water soluble and non-toxic natural dyes may be used. Use of toxic and non-degradable chemical dyes should be strictly prohibited. Natural colors used in food products and permitted in Pharmaceuticals may be preferred. (Action : NGOs, Consumer group)

iv) In case of idol immersion in sea, immersion may be done beyond 500 meters of low-tide line. The low-tide line may be informed well in advance. Also, proper motor boats with security personnel/ home guards may be deployed to supervise immersion. (Action : Local Body)

v) A co-ordination committee comprising Police, Non-Government Organisations and representatives of religious groups may be set up for guiding the public in carrying out immersion with minimal adverse impacts on water bodies. (Action : Sate Government)

vi) In case of immersion of idols in rivers and lakes, arrangements may be made for construction of temporary confined ponds/bunds for the purpose of immersion of idols including disposal of material used for worship. After the completion of immersion, supernatant river water/ pond water may be disposed in river/pond/lake after checking for colour and turbidity. If necessary, treatment should also be provided prior to disposal. (Action : Local Body)

vii) Prior to immersion, worship material like, flowers, vastras (clothes), decorating material (made of paper and plastics),

# मुर्ती विसर्जन के लिए कुबनप ने बनाया कृत्रिम तालाब

बदलापूरः- कुळगांव बदलापूर नगरपालिका के नगराध्यक्ष राम पातकर और मुख्याधिकारी श्री. धुपे के प्रयास से पर्यावरण की रक्षा करने तथा नदी का प्रदूषण रोकने के उद्देश्य से कुळगांव बदलापूर नगरपालिका ने बदलापूर पश्चिम उल्हासनदी के पास कृत्रिम तालाब बनवाया है. इस कृत्रिम तालाब में गणेश प्रतिमा तथा गौरी विसर्जन करने का विचार अमल में लाया गया. २९ अगस्त को शाम चार बजे से कृत्रिम तालाब में गणेश विसर्जन की शुरुवात हुई. रिक्शा चालक कदम तथा अन्य लोग गणेश विसर्जन के लिए वहां पर आए थे, विसर्जन से पूर्व गणेशजी की पूजा अर्चना करके गणेशजी की प्रतिमा का विसर्जन किया गया. वहां पर मनपा के कई कर्मचारी भी उपस्थित थे जो गणेश विसर्जन के लिए गणेश भक्तों की मदद कर रहे थे. स्वयं नगराध्यक्ष श्री. नंदकिशोर (राम) पातकर, भाजपा जिला उपाध्यक्ष प्रशांत (अण्णा) कुलकर्णी, एम एम आर डी ए की पदाधिकारी श्रीमती. शैलेजा भाटीया तथा तडफदार नगरपालिका के अभियंता श्री. मांडेकर तथा अन्य अधिकारी और कर्मचारी उपस्थित थे. कृत्रिम तलाब का विमोचन प्रथम गणेशजी का विसर्जन राम पातकरजी की उपस्थिती में किया गया. श्री. राम पातकरजी ने सभी लोगों को आवाहन किया है कि, वह कृत्रिम तालाब में गणेशजी की मुर्ती विसर्जीत करें. तालाब और नदी के पास बदलापूर पुलिस थाने के अधिकारी और कर्मचारी भी कायदा और सुव्यवस्था की व्यवस्था देखने में व्यस्त थे. बदलापूर पुलिस थाने के मुख्य निरीक्षक श्री. बागल पूरी तरह से सुरक्षा व्यवस्था की देखभाल

(शेष पृष्ठ २ पर)



फोटो-महेश कामत

उल्हासनगर जिला भाजपा उपाध्यक्ष प्रशांत (अण्णा) कुलकर्णी, नगराध्यक्ष नंदकिशोर (राम) पातकर, एमएमआरडीए की श्रीमती. शैलेजा भाटिया तथा नगरपालिका के अभियंता श्री. मांडेकर



फोटो-महेश कामत

कृत्रिम तलाब का निरीक्षण करते हुए कुळगांव बदलापूर नगरपरिषद के नगराध्यक्ष श्री. नंदकिशोर (राम) पातकर

# कृत्रिम तलावात गणेशाचे विसर्जन

बदलापूर/वार्ताहर

गणेश विसर्जनासाठी नगरपालिकेच्या वतीने नदीकिनारी गणेश घाटावर कृत्रिम तलाव बांधण्यात आला आहे. या तलावामध्ये सात दिवसांचे घरगुती आणि काही सार्वजनिक मंडळाच्या गणेश मूर्त्या विसर्जित करण्यात आल्या.

पर्यावरण सुधारणा संस्था आणि पालिकेच्या संयुक्त विद्यमाने यंदा शहरात प्रथमच ही सोय करण्यात आली आहे. तीन लाख रुपये खर्चाच्या या कामास अनुदान दिले आहे. समर्थ एंटरप्रायझेसच्या वतीने नगराध्यक्ष राम पातकर आणि मुख्याधिकारी सुदाम धुपे यांच्या मार्गदर्शनाखाली ही सोय केली आहे, असे पालिकेचे नगर अभियंता टी. एन. मांडेकर यांनी सांगितले.

**Publicity in various Newspapers on 30/08/09**













गणपतीबाप्पा मोरया,
गणेशमुर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात
करुन,
पर्यावरणाचा समतोल राखू या !



PAGE NO:
DATE: 29/8/09

कृत्रिम तलाव नगरपालिकेने तयार केल्याने
आम्हा भक्तांना खूप सोईस्कर झाले आहे
याबद्दल धन्यवाद

आनंद [illegible]



PAGE NO:
DATE:

नगर परिषदेने कृत्रिम तलाव केल्यामुळे
नगर परिषदेचे मनापासून धन्यवाद.
[illegible]
धन्यवाद
[illegible]
[illegible]

**Reaction from Ganesh Devotees**

॥ श्री ॥

कृत्रिम तलाव ही संकल्पना कुळगांव बदलापूर नगरपरिषदेने राबविली आहे ती उत्तम असून. ती पर्यावरणाला पोषक आहे.

धन्यवाद.

कुळगांव-बदलापूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष श्री-राम पातकर यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश विसर्जनासाठी प्रथमच कृत्रिम तलावाची सोय उत्तम केली आहे. धन्यवाद व आभार।

**Reaction from Ganesh Devotees**

# कुळगांव-बदलापूर नगरपरिषद

कुळगांव (पूर्व), तालुका-अंबरनाथ, जिल्हा - ठाणे. पिन कोड नं.- ४२१५०३.

फोन :- ९५२५१ - २६९१५५६.

संदर्भ :क्र.कुबनप/नरवि/६६४/२००९ ~~२०२०~~ 2090 दिनांक : 29/08/२००९.

प्रति,

गणेशनगर मित्र मंडळ,

गणेशनगर कुळगांव-बदलापूर (प.)

विषय :- गणेशत्सव/~~नवरात्र~~ उत्सवा करिता तात्पुरती परवानगी बाबत.

संदर्भ :- आपला दिनांक १८/०८/२००९ चा अर्ज.

१) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ कल्याण यांचे दिनांक २९/७/२००९ चे पत्र क्र.एमपीसीबी/एसआरओके-११/२८५ अन्वये परवानगी देणे बाबत नियमन.

उपरोक्त विषय संदर्भात आपणास कळविण्यात येते की, खालील अटी शर्तीवर आपणास गणेशत्सव/~~नवरात्रौत्सव~~ कालावधीत दि. 23/08/२००९ ते दि. 29/08/२००९ पर्यंत तात्पुरती परवानगी देण्यात येत आहे.

१. सर्व सक्षम प्राधिकरणाच्या परवानग्या घेण्याची जबाबदारी आपणांवर राहिल.
२. आदर्श अचार संहीतेचे पालन केले पाहिजे.
३. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ कल्याण यांचे दिनांक २९/७/२००९ चे पत्र क्र.एमपीसीबी/एसआरओके-११/२८५ गणेशमुर्ती बाबत कशी असावी यांचे वेब साईट माहिती (http://mpcb.gov.in). सोबत जोडत असले प्रमाणे कार्यवाही व्हावी.
४. रहदारीस अथवा वाहतूकीस अडथळा होणार नाही याची काळजी घ्यावी.
५. सदरच्या ठिकाणी अपघात घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आपणांवर राहिल.
६. अग्निशमन साधणे ठेवणे आवश्यक राहिल.

मुख्याधिकारी,
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद
कुळगांव.

**NOC to register Mandal to avoid water pollution & awareness campaign during Ganesh Festival**

स्थापना वर्ष २००१

# श्री साई सेवक सार्वजनिक मित्र मंडळ

**सार्वजनिक गणेशोत्सव**

**समर्थ नगर, बदलापूर (प)**

दि. ३/९/२००९

मा. मुख्याधीकारी
कुळगांव बदलापूर नगर परिषद
बदलापूर,

यांसी,

आपणास या पत्राद्वारे विशेष आभार मानावेसे वाटतात कारण हल्लीच्या परिस्थीतील श्री गणेशाच्या मुर्त्या शाडुच्या कमी प्रमाणात बनवुन P.O.P च्या अधिक प्रमाणात बनवतात आणि त्या विक्री करतात

कारण P.O.P पासुन मुर्ती बनवण्यासाठी कमी वेळ आणि अधिक फायदा असतो, परंतु त्या मुर्ती प्रदुषणासाठी कारणीभुत ठरु शकतात आणि त्या मुर्त्या पाण्यामध्ये लवकर विरघळत नाहीत.

यावर आपण श्रीगणेशाच्या मुर्त्या नदित किंवा पाण्यात विसर्जन करुन होणारे प्रदुषण रोखण्यासाठी कृत्रीम तळ्याची आखलेली आणि साकारलेली कल्पना खुपच सुरेख होती.

एक प्रकारे प्रदुषण मुक्त बदलापूर म्हणावेसे वाटेल.

यापुढे सुध्दा आपण अशाच प्रकारची संकल्पना राबवुन खरोखरच प्रदुषण मुक्त बदलापूर कराल अशी अपेक्षा बाळगतो

आपले नम्र

[signature]

धनंजय रा. पावसकर
(अध्यक्ष)

थन्यवाद

॥ जय हिन्द, जय महाराष्ट्र ॥

**Feedback from Ganesh Mandals**